# 3 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी PDF Download




‘म्यू’ विषाणूवर लशींची परिणामकारकता कमी :

- करोनाच्या नव्या म्यू या उत्परिवर्तित विषाणूवर लशींची परिणामकारकता कमी आहे. तो मोठ्या प्रमाणात लशींना प्रतिरोध करणारा आहे, असा इशारा जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे.
- **बी.1.621** असे शास्त्रीय नाव असलेल्या म्यू विषाणू हा कोलंबियामध्ये जानेवारी 2021 मध्ये प्रथम आढळला.
- दक्षिण अमेरिका, युरोप येथे त्याचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला असून करोना विषाणूचा हा प्रकार ब्रिटन, हाँगकाँग येथेही आढळला

आहे, अशी माहिती संयुक्त राष्ट्रांच्या आरोग्य संघटनेने मंगळवारी करोना महासाथीच्या पार्श्वभूमीवर जाहीर केलेल्या साप्ताहिक अहवालात दिली आहे.

- मार्चपासून **डब्ल्यूएचओच्या निरीक्षणाखाली असलेला म्यू हा पाचवा** ‘निरीक्षणाधीन उत्परिवर्तन’ आहे.

PF खात्यातील रकमेवर मिळणाऱ्या व्याजावर भरावा लागणार TAX :

- केंद्र सरकारने नवीन आयकर नियमावली अधिसूचित केली आहे ज्या अंतर्गत विद्यमान भविष्य निधी खाती (PF) दोन स्वतंत्र खात्यांमध्ये विभागली जातील.
- तर केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने **(CBDT) या संदर्भात अधिसूचना जारी** केली आहे. अधिसूचनेनुसार, पीएफवरील व्याज मोजण्यासाठी पीएफ खात्यातच एक वेगळे खाते उघडले जाईल.
- नवीन अधिसूचनेनंतर, सर्व कर्मचारी भविष्य निधी खाती करपात्र आणि कर-नसलेल्या योगदान खात्यांमध्ये विभागली जातील.
- तसेच CBDT अधिसूचनेनुसार **31 मार्च 2021** पर्यंत कोणत्याही योगदानावर कोणताही कर लावला जाणार नाही.
- परंतु 2020-21 आर्थिक वर्षानंतर पीएफ खात्यांवर मिळणारे व्याज करपात्र असेल आणि त्याची स्वतंत्र गणना केली जाईल.
- CBDT ने आपल्या अधिसूचनेत म्हटले आहे की नवीन नियम **1 एप्रिल 2022** पासून लागू होतील.

**3 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी**

राजीव गांधी यांचे नाव ओरंग राष्ट्रीय उद्यानाच्या नावातून वगळण्याचा निर्णय :

- केंद्राने राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार हे नाव बदलून मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार असं केल्यानंतर एका महिन्यापेक्षाही कमी कालावधीनंतर आसाम मंत्रिमंडळाने **माजी पंतप्रधान राजीव गांधी** यांचे नाव ओरंग राष्ट्रीय उद्यानाच्या नावातून वगळण्याचा निर्णय घेतला आहे.
- गुवाहाटीच्या **उत्तर-पूर्वेस सुमारे 120 किमी अंतरावर** ओरंग उद्यान आसामच्या सात राष्ट्रीय उद्यानांपैकी एक आहे आणि गेंड्यांच्या पहिल्या तीन निवासस्थानांपैकी एक आहे.
- तर देशात वाघांची संख्या सर्वाधिक असलेल्या क्षेत्रांपैकी हे एक क्षेत्र आहे.
- ओरंगला **1985** मध्ये वन्यजीव अभयारण्य घोषित करण्यात आले आणि **1999** मध्ये राष्ट्रीय उद्यानात सुधारित करण्यात आले.
- राष्ट्रीय उद्यान राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणाने मार्च 2016 मध्ये व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित केले होते.

देशात लहान मुलांसाठी येणार करोनाची चौथी लस :

- हैदराबादची स्वदेशी फार्मा कंपनी बायोलॉजिकल ई लिमिटेड या कंपनीला ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने काही अटींसह दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील चाचण्यांसाठी मंजुरी दिली आहे.
- तर या चाचण्या **5 ते 18 वर्षांच्या मुलांवर** केल्या जातील.
- तसेच देशात 10 ठिकाणी चाचण्या केल्या जाणार आहेत.
- डीसीजीआयकडून मुलांवर चाचण्यांसाठी परवानगी मिळालेली **बायोलॉजिकल ई ही चौथी लस** आहे.

**3 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी**

महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेत अखिल मराठी बुद्धिबळ संघटना विलीन :

- महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेने बोलविलेल्या ऑनलाईन विशेष सर्वसाधारण सभेमध्ये महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेमध्ये अखिल मराठी बुद्धिबळ संघटनेचे विलीनीकरण झाले.
- त्याचबरोबर महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेच्या अध्यक्षपदी भंडाऱ्याचे डॉक्टर परिणय फुके यांची एकमताने निवड करण्यात आली.
- तर माजी अध्यक्ष **पुण्याचे सिद्धार्थ मयूर यांची कार्याध्यक्ष** म्हणून सर्वानुमते निवड झाली. सांगलीच्या अनिल ताडे यांची मुख्य कायदे सल्लागार म्हणून निवड करण्यात आली.
- तसेच या सभेमध्ये राज्यातील **36 जिल्हयांपैकी पैकी 27 जिल्हयांतील** जिल्हा बुद्धिबळ संघटनाना संलग्नता देण्यात आली.

कर्णधार विराट कोहलीचा नवीन विक्रम :

- भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार विराट कोहलीने इंग्लंड विरुद्धच्या **चौथ्या कसोटीत नवा विक्रम प्रस्थापित** केला आहे.
- आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये वेगाने 23 हजार धावा करण्याचा विक्रम त्याच्या नावावर प्रस्थापित झाला आहे.
- तर वेगवान धावा करण्याच्या यादीत त्याने मास्टर ब्लास्टर **सचिन तेंडुलकर, ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉन्टींगसारख्या दिग्गजांना मागे टाकलं** आहे.
- विराटने ओवलमध्ये इंग्लंड विरुद्धच्या चौथ्या कसोटीत एक धाव करत 23 हजार धावा पूर्ण केल्या.

- तसेच हा विक्रम प्रस्थापित करणारा जगातला सातवा खेळाडू ठरला आहे आणि **भारताचा तिसरा खेळाडू ठरला** आहे.

दिनविशेष :

- **सन** 1752 मध्ये अमेरिकेत ग्रेगरियन कॅलेंडरचा वापर सुरू झाला.
- श्रीमती ॲनी बेझंट यांनी 3 **सप्टेंबर** 1916 मध्ये होमरुल लीगची स्थापना केली.
- महाराष्ट्र शाहीर कृष्णराव तथा शाहीर साबळे यांचा जन्म 3 **सप्टेंबर** 1923 मध्ये झाला.
- लक्ष्मीकांत-प्यारेलाल या जोडीतील संगीतकार प्यारेलाल शर्मा यांचा जन्म 3 **सप्टेंबर** 1940 मध्ये झाला.
- **सन** 1971 मध्ये कतारला स्वातंत्र्य मिळाले.

## September 2021 chalu ghadamodi PDF Download

| Sr.No. | Name | Links | View PDF |
|---|---|---|---|
| 1 | 1 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 2 | 2 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |

# आरोग्य भरतीसाठी १६, १७ ऑक्टोबरला परीक्षा

## दिव्यांग व खुल्या प्रवर्गासाठी १ ते १४ सप्टेंबरपर्यंत अर्ज करता येणार

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील वर्ग 'क' व 'ड' कर्मचारी भरतीची स्थगित प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली आहे. दिव्यांग संवर्गाचे आरक्षण निश्चित करून व मराठा समाजाचे आरक्षण रद्द केल्यानंतर उर्वरित सर्व प्रवर्गनिहाय आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. यामुळे दिव्यांगांना प्रमाणपत्र सादर करणे, नव्याने अर्ज भरणे, वाढलेल्या खुल्या प्रवर्गातील जागांसाठी नव्याने अर्ज मागवणे आदींसाठी १ ते १४ सप्टेंबरची मुदत देण्यात आली आहे. या भरतीसाठी १६ व १७ ऑक्टोबरला परीक्षा होणार आहे.



राज्य सरकारने जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील आरोग्यसेवक, आरोग्यसेविका, आरोग्य पर्यवेक्षक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधनिर्माण अधिकारी भरतीप्रक्रियेसाठी २०१९ मध्ये अर्ज मागवण्यात आले होते. त्यानंतर ही भरतीप्रक्रिया स्थगित झाली होती. कोरोना महामारीच्या काळात राज्य सरकारने ही भरतीप्रक्रिया पुन्हा सुरू केल्यानंतर न्यायालयाच्या निर्णयानुसार दिव्यांगांसाठीचे आरक्षण निश्चित करण्याचे निर्देश दिले होते. ते काम सुरू असतानाच राज्य सरकारने पुन्हा जुलैमध्ये ही भरतीप्रक्रिया पुढे ढकलली होती. आता प्रशासनाने दिव्यांग आरक्षणाचा समावेश करून व मराठा समाजाचे आरक्षण रद्द करून इतर सर्व संवर्गांचे आरक्षण निश्चित केले आहे. यामुळे आता १ ते १४ सप्टेंबर या काळात मराठा समाज आरक्षणातून अर्ज भरलेल्या उमेदवारांना सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे, सर्वसाधारण वर्गातील उमेदवारांना ईडब्ल्यूएसमधून अर्ज भरावयाचा असल्यास त्यासाठीचे कागदपत्रे जोडणे, सर्वसाधारणमधून अर्ज भरलेल्या दिव्यांगांना त्यांचे प्रमाणपत्र सादर करणे यासाठी मुदत देण्यात आली आहे.

तसेच खुल्या प्रवर्गातील वाढलेल्या जागा व नव्याने दिव्यांग प्रवर्गातून अर्ज करण्यासाठी नव्या उमेदवारांना १ ते २१ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर २२ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा केंद्र निश्चित करणे, परीक्षेसाठी पर्यवेक्षकांची नियुक्ती करणे आदी बाबींची पूर्तता केली जाणार आहे. या भरतीच्या परीक्षेसाठी उमेदवारांना ६ ते १५ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा प्रवेशपत्र ऑनलाइन डाउनलोड करता येणार आहेत. या भरतीसाठी संवर्गानिहाय १६ व १७ ऑक्टोबरला परीक्षा होणार आहे.

Academy